ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

शास्त्रीय संगीतातील महत्वपूर्ण घटक : स्वरतत्व लयतत्व

प्रा. डॉ.पूर्णिमा एस. दिवसे
शासकीय विदर्भ ज्ञान
विज्ञान संस्था, अमरावती

प्रस्तावना :–

अभिजात संगीताची चर्चा करत असतांना स्वर व लय हया संगीताच्या दोन घटकांचा विलास ज्या गायकीत होतो ते अभिजात संगीत होय. संगीताची जी व्याख्या केलेली आहे. ' गीतम् वाद्यम् नर्तनच त्रयम् संगीतमुच्यते ' या तिन्ही कलामंध्ये स्वर व लय तत्वाला सारखेच महत्व दिलेले दिसून येते. राग तिळककामोदच्या एका बंदिशीतही याचा उल्लेख आढळतो. स्थायी :– सुर संगत राग विद्या अंतरा :– ताल मूलधर्म राखिये! स्वर व लय यांचा अतुट संबंध असुन संगीतातील हे महत्वाचे पैलू आहेत. स्वर हे जर संगीताचे शरीर असेल तर ताल – लय हा संगीताचा आत्मा आहे. आत्माशिवाय शरीर जसे मृत सांगाडा तसे तालाशिवाय संगीत गतिहीन वाटते. स्वर म्हणजे सच्चिदानंद तर लय म्हणजे चैतन्य.

ध्वनिच्या– हस्वदीर्घत्वाच्या वैशिष्टयांमुळे संगीतात स्वर व लय दोन्हीची निर्मिती झाली आहे. अखंड व दीर्घकाळ टिकणाऱ्या नादातून स्वर निर्माण झाले. म्हणजेच कालमापन या गुणधर्मामुळेच स्वर व लय तत्वाची निर्मिती झाली आणि संगताची आदितत्वे म्हणून ही मान्य पावलेली आहेत. संगीताचे जेष्ठ अभ्यासक व लेखक श्री वा. ह. देशपांडे यांनी स्वरांना कच्चा माल ठरवून स्वरांना संगीतत्व प्राप्त करून देण्याचे काम लय करीत असल्याचे म्हटले आहे. पुढे ते म्हणतात संगीताचे माध्यम फक्त लय व फक्त स्वर नसून लय संस्कारीत स्वर होय.

मतंग यांच्या बृहद्देशी ग्रंथात 'स्वयं राजते इति स्वर : ' अशी स्वराची व्याख्या केलेली आहे. म्हणजेच जो स्वतःप्रकाशमान आहे, स्वयंभू आहे तो स्वर. जो श्रोत्याचे मन स्वतःच रंजवितो तो स्वर अशी स्वराची व्युत्पत्ती सांगितली आहे. संगीत विश्वातील अद्भूत किमयागार ' स्वर ' स्वरांच्या माध्यमातूनच संगीताकृतिचा आविष्कार साधल्या जातो. अगदी सुरूवातीला संगीत हे तीनच स्वरात सामावले होते. नंतर मात्र हया स्वरांचा विकास होऊन सात स्वर अस्तित्वात आले व यातुनच सप्तक तयार झाले. मंद्र,मध्य, तार या तीन सप्तकात भारतीय संगीत सामावलेले आहे.

श्री अशोक रानडे यांनी स्वर संकल्पनेचे स्पष्टीकरण याप्रमाणे केलेले आहे. गोगांट, ध्वनी, नाद या क्रमाने स्वराचे अवतरण होते. गोंगाट म्हणजे आवाजाचा समूह, ध्वनी म्हणजे ओळखता येणारा आणि पुनरूत्पादन शक्य आहे असा आवाज होय. नाद म्हणजे सांगितीक शक्यता असलेला ध्वनी होय. आपल्याला श्रवणानंद देणारा हा स्वर व्यवहारात याला आपण नाद म्हणतो. शारंगदेवाच्या 'संगीत रत्नाकर हया ग्रंथात शरीरोत्पदी हया दुसऱ्या अध्यायात नाद संकल्पना स्पष्ट केलेली आहे. नादाचे दोन भेद सांगितलेले आहेत. 1) आहत नाद 2) अनाहत नाद. आघाताने उत्पन्न होणारा आहत नाद व आघातहीन असा जो नाद तो अनाहत नाद होय. संगीतात आहत नादाचाच विचार केलेला आहे. हया नादातील 22 श्रुतिच संगीतापयोगी मानून 12 स्वर हयात विभाजित केलेले आहे. (यापैकी सा व प हे स्वर अचल असून रे ग ध नि हया स्वरांची शुध्द व कोमल रुपे आहेत तर म हया स्वराची सुध्दा शुध्द व तीव्र अशी दोन रुपे आहेत.) या 12 स्वरांची कलात्मक गुंफण करुन त्याचे वेगवेगळे आकृतीबंध करुन वेगवेगळया रांगाची उभारणी केल्या गेली. राग रचना ही भारतीय संगीताची मौलिक वस्तू आहे.' योयंध्वनी विशेषस्तु स्ववर्णविभूषितः रंजको जन चित्ताना स राग कथितौ बुध्दै!श्श श्रीनारायण रातानजनकर म्हणतात यातील स्व या शब्दाने सुचविले जाते की राग हा स्वरांनीच व्यक्त होतो. गायक कलावंत मैफिलीत गाण्यासाठी बसलेला असतो तेव्हा त्याच्यासमोर स्वरांचे विश्व असते. राग या संकल्पनेतच आलाप, बोलाआलप, बोलताना, सरगम, स्वंरसंवाद, (स्वरसंगती ही मींड, गमक, कण, स्पर्शस्वर यामुळे साधली जाते.) इ. स्वरांची भिन्न रुपे सामावलेली आहे व यामुळेच रागात सौंदर्य निर्माण करता येते. व्याकरणदृष्टया कोमल, तीव्र, शुध्द या स्वरांच्या व्याख्या जरी असल्या तरी एकच स्वर विविध रागातून प्रकट होतांना वेगवेगळा भासतो. (उदा. कोमल धैवत भैरव, दरबारी कानडा व अडाणा रागातील कोमल धैवत प्रत्येक रागात किती कोमल लावावा याचे प्रमाण रागागणिक भिन्न असते. त्याचप्रमाणे मुलतानी व तोडीचा गांधार ऐकतांना वेगळा असल्याचे जाणवते.) संगीताचे गाढे अभ्यासक व विचारवंत कै.गोविंदराव टेंबे हयांनी स्वराची व्याख्या याप्रमाणे केलेली आहे. ते म्हणतात वाद्यातील ध्वनी, अनुरणनामुळे लांबतात आणी कंठातून निघणारे ध्वनी सुखदुःखादी संवेदनामुळे लांबतात अशा लांबविलेल्या ध्वनीमध्ये नाद माधुर्य व संवादक्षमता ही जेव्हा असतात तेव्हा त्यांना स्वर संज्ञा प्राप्त होते. एकंदर गोविंदराव टेंबे यांनी आपल्या संगीत विचारातच भावना हया घटकाला महत्व दिलेले आहे. म्हणजेच स्वरातून (पर्यायाने रागातून) विविध भावना प्रकट होत असतात व त्याद्वारे अनोखी रसनिष्पत्तीही होत असते. घरंदाज गायकी ह्या आपल्या पुस्तकात वा.ह.देशपांडे स्वर ही संकल्पना स्पष्ट करतांना म्हणतात. संस्कारीत करुन त्यावर वेगवेगळे अलकांर चढवून समृध्द केलेला असा आपला गळा म्हणजे 'स्वर' होय. (स्वरप्रधानतेमुळे एक सौंदर्यलक्षी घराणे निर्माण झालेले आहे.) भिन्न – भिन्न लेखन शैलीच्या भिन्न 'रिती ' संस्कृत काव्यात निर्माण झाल्या तशाचप्रकारे व्यक्तिपरत्वे भिन्न आवाज धर्मावर व स्वर–लयींच्या मिलाफाच्या प्रमाणावर प्रमुख सहा घराण्यांची विभागणी केली आहे ती याप्रमाणे.

1) स्वर व लय यांचे समप्रमाण – जयपूर व ग्वाल्हेर
2) स्वरप्रधान पण लयीला महत्व – पतीयाळा
3) स्वरप्रधान पण लयीला महत्व कमी – इंदोर
4) स्वरप्रधान – किराणा
5) लयप्रधान – आग्रा

आपल्या विविध रुपातून रसिकांच्या कर्णेद्रियांना सुखावणारा हाच तो स्वर स्वयंभू, चैतन्यदायक, आल्हाददायक, सुखकारक, त्याच्याविना भारतीय संगीताला अस्तित्वच नाही. पृथ्वीच्या उत्पत्तिपासून जगात लयीचा प्रांरभ झाला. निसर्गातील सर्व गती लयबध्द आहेत. ही लयबध्दता अखिल ब्रम्हांडात दिसुन येते. उदा. नाडीचे ठोके श्वासोच्छवास, ऋतूचक्र, भरती – ओहोटी , ग्रहांचे परीभ्रमण, पृथ्वीचे परीभ्रमण या सर्व गती लयबध्द आहेत.

मानवी संस्कृतिच्या विकासाबरोबर ललित कला आदिचा उदय झाला. इतर ललित कलांमध्ये लयीचे स्वरूप हे अव्यक्त असते तर संगीत कलेत लयीचे स्वरूप स्पष्ट असते. 'लय या शब्दाचा प्रयोग वेगवेगळया संदर्भात केलेला दिसून येतो. (व्यवहारिक भाषेत लय या शब्दाचा अर्थ एकरूपता आणि दुसरा नाश असा होतो. क्रियेचा विराम झाला म्हणजे नाश होतो. पण ती क्रिया पूर्णपणे थांबत नाही तर त्यातून येणाऱ्या क्रियेच्या पुनरूत्थानाची कल्पना सुचवतो. विराम हे पूर्वक्रियेचे अंत्यरूप आहे. तर आगामी क्रियेचे पूर्वरूप आहे.) संगीतात लय या शब्दाचा अर्थ गायन, वादन, नृत्यामधील क्रियांना जो कालावधी लागतो त्या कालावधीच्या गतिला लय म्हणतात. सर्व क्रियाचा आधार गती आहे. गतिमुळेच लय निर्माण होते. लयीची व्याख्या श्री अशोक रानडे यांच्यानुसार 'सर्जक केंद्राचा पुनरूद्भव म्हणजे लय होय.' तर विदेशी लेखिका सुसान लॅंगरयांचे नुसार उत्कंठा व विसर्जनाला लय म्हणतात. गोंविदराव टेंबे यांनी ध्वनीवर पडणाऱ्या समांतर आघातालाच 'लय' म्हटलेले आहे. इनसाईकलेपिडीया ब्रिटानिकामध्ये लयसंबंधी असे लिहीलेले आहे.

Rhythm can exist without melody but melody cannot exist without rhythm. Rhythm is the organic process of music in time, it is music' s direction in time."

लय आणि तालासंबधी 'श्रुति माता लय पिता असे वचन आहे. म्हणजेच लय व ताल हे वेगवेगळे करता येत नाही. भरतानेही स्वरतत्वाला शब्द व कालतत्वाला छंद संबोधून दोन्हीला अभिन्न सांगितलेले आहे. लय या संकल्पनेतून तालाची उपत्ती झालेली आहे. (ताल हे गायन, वादन, नर्तनातील कलाविष्काररूपी बागबगीच्याचे कुंपण आहे. तर लय ही बागबगीच्यातील आकर्षक सौंदर्याकृती होय.) काल, क्रिया, विराम या तिन्हीच्या संयोगातून तालाची उपत्ती झालेली आहे. गायन, वादन, नर्तन क्रियेतील कालमापन करण्याच्या क्रियेला ' ताल ' म्हणतात. संगीतामध्ये तालाच्या पायावरच रागाची इमारत उभी राहते तालाच्या रूपाने संगीताला प्रतिबंध प्राप्त होतो. तालामुळे गायन.वादन.नर्तन हया क्रिया उठावदार होतात त्याप्रमाणे त्यांना सौंदर्यही प्राप्त होते. (भाषेत ज्याप्रमाणे व्याकरणाची आवश्यकता असते त्याप्रमाणे भारतीय संगीताला तालाची नितांत गरज असते. ताल साथ संगतीचे तीन प्रकार आहेत. गायन,वादन नृत्याबरोबर त्यांना साथ करण्याची एक पध्दत दुसरी पध्दत तालवादक मुख्यकलाकाराप्रमाणेच स्वराचे (शब्दाचे) लय व वजन आपल्या वाद्यावर प्रतिध्वनित करण्याचा प्रयत्न करतो व दोघेही एकदम एकसाथ समेवर येतात. तिसरा प्रकार सवाल जवाबाचा मुख्य कलाकार जे माडतो त्याची तशीच मांडणी संगतकार वाद्यावर करून दाखवून उत्तर देतो. तालाचा प्रमुख घटक लय होय. दोन मात्रामधील जे अंतर, गॅप, अवकाश कसा व किती प्रमाणात ठेवला आहे त्यानुसार लयीचे प्रमाण व लयीचे प्रकार ठरवतात. (पहिल्या दोन मात्रांमध्ये जे अंतर तेच दुसऱ्या.तिसऱ्या, तिसऱ्या.चवथ्या मात्रांमध्ये असावे लागते.) लयीचे मुख्य 3 प्रकार आहेत. 1) विलंबित 2) मध्य लय 3)द्रुतलय. दोन मात्रांमधील अंतर दीर्घ अवकाशाचे असते तेव्हा त्या लयीला विलंबित लय म्हणतात. विलंबित लयीच्या दुप्पट जलद ती मध्यलय आणी मध्यलयीच्या दुप्पट ती द्रुतलय होय. या लयीमुळे रसानंदातही फरक पडतो. रसोप्तत्तीचे दुसरे महत्वाचे अंग ' लय ' मानल्या गेले आहे. रागाचे निरीक्षण केल्यास असे दिसेल की काही राग संथ लयीचे तर काही राग मध्यलयीचे तर काही द्रुत लयीचे आहेत रागांचे स्वर समान असून देखील ते भिन्न रसपोषक आहेत असे दिसते. उदा. पूरिया, मारवा,सोहनी या तिनही रागात लागणारे स्वर एकच आहेत पण प्रत्येकाची ठराविक अशी लय आहे. त्यात बदल झाला तर उत्पन्न होणारा रसही बदलतो. (उदा. भैरव, कालीगडा, जोगिया) त्याचप्रमाणे निरनिराळे ताल ऐकतांना होणारी लयीची अनुभूतीही भिन्न–भिन्न असते. हया भिन्नतेचे मूळ गायकाने स्विकारलेल्या प्रमाण लयीत सापडते. स्वराची अंगभूत लय, तालाची अंगभूत लय आणि प्रमाणलय याची जाणीव गतितत्वामुळे होते. गतिच्या निर्मितीशील प्रवृत्तीचे घोतक आहे. लय हा स्वरांगाचाही घटक आहे. स्वरागामधल्या लयीने स्वतःच तालाचे बंधन स्विकारलेले असते. आणी त्या बंधनात राहुनच ती आपले स्वातंत्र्य उपभोगत असते. यादृष्टीने किराणा गायकी लक्षात घेता येईल. तालांगामधल्या लयीत 'सोलो' वादनात असे स्वातंत्र्य उपभोगता येते, त्यावेळेस तालागामधील लय स्वतःच स्वरपातळीवर (लहेरा) बंधन स्विकारते आणि त्या बंधनातच ताल आपले स्वातंत्र्य उपभोगतो. संगीताचे आशय द्रव्य स्वर तर आकारद्रव्य लय होय. गतितत्वाचे द्योतक असणारी लय रागाच्या आकारधारणेच्या प्रक्रियेत सुरवातीपासून शेवटपर्यंत कार्यरत असते. स्वरलयीचे अभिन्नवत्व म्हणजे स्वसकृतीःस्वर हया घटकात भावनेचे अंग तर लय हया घटकात बुध्दीचे अंग अंतर्भुत असते. स्वराच्या आधराने विकास पावलेले राग बंदिशी, गीते, तर्ज वगैरे संगीत प्रकार आपल्याला विशिष्ट भावस्थितीत नेऊन आनंद मिळवून देतात तर लयीच्या आधाराने विकसित झालेले ताल मानवाला अलैकिक आनंद स्थितीत नेतात.

संदर्भ ग्रंथ :–

1) संगीत विशारद, लक्ष्मीनारायण गर्ग, हाथरस कार्यालय
2) निबंधमाला, जगदीश नारायण पाठक, इलाहाबाद
3) भारतीय संगीताचा इतिहास – डॉ. शरदचंद्र परांजपे
4) संगीत बोध – डॉ. शरदचंद्र पराजपे
5) हिंदुस्थानी संगीत पध्दती – मुलतत्वे आणि सिध्दांत – प्रा. डॉ. बाळ पुरोहित
6) घरंदाज गायकी – श्री. वा.ह. देशपांडे.